परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 90 | गुरुवार दि. 23 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकांने 'वसुंधरा रक्षकाची भूमिका बजावावी- पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

### » वसुंधरा दिनानिमित्त 'वसुंधरा रक्षक अभियान', महा आरपीईटी अभियानाचा शुभारंभ




मुंबई, दि. 22 : वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि वेगाने होणारे शहरीकरण याच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने 'वसुंधरा रक्षक' म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. 'वसुंधरा रक्षक' ही संकल्पना केवळ उपक्रम नसून एक जनआंदोलन बनवण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे आयोजित समारंभात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते 'वसुंधरा रक्षक अभियान 2026', 'महा-आरपीईटी अभियान, राज्य वातावरणीय कृती कक्षाच्या संकेतस्थळाचे अनावरण तसेच 'इमिशन ट्रेडिंग स्कीम प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. वसुंधरा रक्षक अभियानाच्या लोगोचेही यावेळी अनावरण करण्यात आले. या लोगोची निर्मिती स्वतः मंत्री पंकजा मुंडे यांनी तयार केली आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम आणि विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह कोकाकोला कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते.

'वसुंधरा रक्षक' या संकल्पनेला मातृत्वाची जोड देत मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, वसुंधरा म्हणजे केवळ पृथ्वी नव्हे, तर आपली आई आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विकास, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणाबरोबर प्रदूषणही वाढत आहे. त्यामुळे संतुलित विकासाचा मार्ग स्वीकारत पर्यावरण पान 3 वर

**पंकजा मुंडे व सिद्धेश कदम यांनी जॉईन केली वसुंधरा रक्षक व्हॉटसअप कम्युनिटी**

## मुंडे समर्थकांसाठी गुड न्यूज! डॉ.प्रीतम मुंडे यांचे राजकीय पुनर्वसन

### भाजपने सोपवली मोठी जबाबदारी



बीड जिल्ह्याच्या माजी 'दबंग' खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांच्या राजकीय कारकिर्दीबाबत गेल्या काही काळापासून सुरु असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. तब्बल दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर डॉ. प्रीतम मुंडे यांचे राजकीय पुनर्वसन करण्यात आले आहे. पक्षाने त्यांच्यावर संघटनात्मक पातळीवर मोठी जबाबदारी सोपवली आहे. त्यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा (पश्चिम विभाग) प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे मुंडे समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.डॉ. प्रीतम मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघाचे सलग दोनवेळा प्रतिनिधित्व केले आहे. सन 2014 आणि 2019 च्या निवडणुकीत त्यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळवला होता. मात्र, 2024 च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने नाट्यमय निर्णय घेत प्रीतम मुंडे यांच्याऐवजी त्यांच्या थोरल्या भगिनी तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली. या निर्णयामुळे प्रीतम मुंडे यांच्या पान 3 वर

## आज ठळक

### तुमचे आशीर्वाद लाखमोलाचे"; रुग्णालयात दाखल असलेल्या शरद पवारांसाठी सुनेत्रा पवारांची खास पोस्ट



प्रकृतीच्या कारणास्तव शरद पवार बारामती पोटनिवडणुकीच्या मतदानाला उपस्थित राहू शकणार नाहीत. शरद पवार यांनी स्वत: याबाबत एक्सवर पोस्ट करुन माहिती दिली. पवारांना मंगळवारी उपचारासाठी मुंबईत ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यांनंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शरद पवार यांच्यासाठी पोस्ट करत, त्यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली आहे. अजित पवार यांचे विमान अपघातात अकाली निधन झाल्यानंतर रिक्त झालेल्या बारामती मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उद्या (23 एप्रिल) मतदान होणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी मंगळवारी सांगता सभा पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सभेला हजेरी लावत बारामतीकरांना विक्रमी मतदान करण्याचे आवाहन केले. सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडीच्या वतीने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा जाहीर करत पान 3 वर

### शिखर बँक आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला पूर्णविराम, रोहित पवारही दोषमुक्त



मुंबई : राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांना विशेष सत्र न्यायालयाने दोषमुक्त केले. त्यामुळे या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला आहे.

या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याचा तपास बंद झाला आहे. प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला अहवाल विशेष न्यायालयाने स्वीकारला होता. त्यामुळे, या गुन्ह्याच्या आधारे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) या प्रकरणी दाखल केलेले प्रकरण कायम राहू शकत नाही, असा दावा करून रोहित यांनी दोषमुक्तीच्या मागणीसाठी विशेष न्यायालयात अर्ज केला होता. आपल्याविरुद्ध ईडीने केलेले आरोप हे खोटे असून आपल्याविरुद्ध खटला दाखल केला जाऊ शकत नाही, असा दावाही रोहित यांनी अर्जात केला होता.

रोहित यांच्याव्यतिरिक्त, त्यांचे जवळचे सहकारी आणि व्यावसायिक राजेंद्र इंगवले आणि इतर पाच जणांनीही दोषमुक्तीच्या मागणीसाठी विशेष न्यायालयात अर्ज केला होता. तर रोहित यांच्या अर्जावर गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्याची विनंती ईडीने विशेष न्यायालयाकडे केली होती. खासदार आणि आमदारांच्या प्रकरणांसाठी स्थापन विशेष न्यायालयाचे न्यायाधीश महेश जाधव यांनी रोहित पवार आणि पान 3 वर

## सततच्या पराभवामुळे कदाचित खर्गेंच्या डोक्यावर परिणाम झाला असावा; फडणवीस प्रचंड संतापले



सध्या देशात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. प्रचाराला वेग आला असून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप -प्रत्यारोप सुरु आहेत. मात्र त्यातच आता काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत बोलताना वादग्रस्त विधान केलं आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दहशतवादी म्हटलं आहे. ते चेन्नईमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. एआयएडीएमके पक्ष नरेंद्र मोदींसोबत कशी काय युती करु शकतो, ते एक दहशतवादी आहेत, त्यांचा समानतेवर विश्वास नाही असं खर्गे यांनी म्हटलं होतं. दरम्यान खर्गे यांच्या या विधानामुळे आता नवा वाद निर्माण झाला आहे, भाजप नेत्यांकडून मल्लिकार्जुन खर्गे यांच्या या विधानाचा चांगलाच समाचार घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खर्गे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. पान 3 वर

## जमिनीपासून शिक्षकांपर्यंत राज्य सरकारचे चार मोठे निर्णय



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्यमंत्रिमंळाची बैठक पार पडली. या बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. एक निर्णय नगरविकास खात्याशी, दुसरा उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी आणि उरलेले दोन निर्णय महसूल विभागाशी संबंधित आहेत. या बैठकीत राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसारच मूळ वेतन देण्याचा महत्त्वाचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे या शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पान 3 वर

## 15 ऑगस्टपर्यंत रेल्वे सुरू झालीच पाहिजे; रस्त्यातील ब्लॅकस्पॉट कमी करा

### रेल्वे व महामार्ग आढावा बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना निर्देश



बीड: मागील दोन वर्षात रेल्वे कामाला गती दिलेली आहे. आता रेल्वेचे काम युध्द पातळीवर करून 15 ऑगस्ट 2026 पर्यंत पुणे ते परळी रेल्वे धावलीच पाहिजे, शिवाय बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गासहित ग्रामीण मार्गावरील ब्लॅकस्पॉट कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या हॉलमध्ये रेल्वे पान 3 वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले - प्रा. डॉ. माधव रोडे

### • डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आत्माराम कराड यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न!



परळी - वै : माळहिवरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला . जयंती निमित्ताने निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन सरपंच आत्मरामजी कराड, प्रा. डॉ. माधव रोडे प्रा. विजयजी मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी ॲड . सुनिल सोनपीर , उपसरपंच, जयंती समिती अध्यक्ष , पोलीस पाटील कृष्णा धनघाव आदि होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणुन पान 3 वर

## विद्यार्थ्यांनी वृक्षांचे मित्र म्हणून संगोपन आणि संवर्धन करावे-नगर परिषद शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे

### • विद्यानिकेतन सीबीएससी स्कुल येथे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सभापती योगेश मेनकुदळे यांच्या हस्ते वृक्षारोपण



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाशिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांनी वृक्षांचे मित्र म्हणून संगोपन आणि संवर्धन करीत 'वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती' हा विचार प्रत्यक्षात आचरणात आणावा, वृक्ष तोडीमुळे झालेले दुष्परिणाम पाहावयास मिळत आहेत. अशा परिस्थितीत पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाशिवाय पर्याय नाही. वृक्षारोपणाबरोबर त्यांचे संगोपन आणि संवर्धन महत्वाचे असून ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. असे प्रतिपादन नगर परिषद शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे यांनी विद्यानिकेतन सीबीएससी स्कुल येथे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे यांच्या हस्ते पान 3 वर

## उपवर्गीकरणाच्या संदर्भात परळीत 24 एप्रिल रोजी महत्वपूर्ण चर्चासत्र - मिलिंद घाडगे



परळी प्रतिनिधी भारतीय संविधानाने अनुसूचित जातीला जे संवैधानिक आरक्षण दिले आहे.या आरक्षणात उपवर्गीकरणाच्या नावाखाली अनुसूचित जातीत फुट पाडण्याचा प्रयत्न केंद्र व राज्य सरकार करीत आहे.या बाबात दिनांक 24 एप्रिल रोजी परळीत चर्चासत्र आयोजित केले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी दिली आहे.

परळी शहरातील अनुसूचित जातीतील तमाम बंधू आणि भगिनींना विनंती करण्यात येते की, केंद्र आणि राज्य सरकार महाराष्ट्रातील अनुसूचित जातींना पान 3 वर

## परळीत शानदार सोहळ्यात 19 बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार ; संत -महंत, मान्यवर व समाजबांधवांची प्रचंड उपस्थिती

### सकल ब्राह्मण समाजाने केलेला माझा सन्मान हा तमाम परळीकरांचा सन्मान- नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

### धर्म परायण व्यक्तिमत्व हे उपनयनासारख्या संस्कारांनीच रुजवले जाते - ह.भ.प. बाळू महाराज उखळीकर



परळी वै.(प्रतिनिधी)- ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने आयोजित 46 वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा आज 22 एप्रिल रोजी शानदार व वैभवी स्वरुपात संपन्न झाला.शानदार सोहळ्यात मराठवाड्यातील विविध ठिकाणच्या 19 बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले. या मंगलमय व पवित्र सोहळ्यासाठी संत -महंत, मान्यवर व समाज बांधवांची मोठी उपस्थिती लाभली. धर्मपरायण व्यक्तिमत्व घडविण्यासाठी आपले सोळा संस्कार असल्याचे प्रतिपादन भागवतमर्मज्ञ ह भ प बाळू महाराज उखळीकर यांनी केले. तर सकल ब्राह्मण समाजाने केलेला माझा सन्मान हा तमाम परळीकरांचा सन्मान असल्याची कृतज्ञ भावना परळीच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

गेल्या 46 वर्षापासून ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने अविरतपणे हा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उपक्रम चालवला जातो.शानदार पान 3 वर

# इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन(अँन्टी पायरेसी सेल) मुंबई आयोजित राज्यस्तरीय भारत सन्मान पुरस्कार सोहळ्यात प्रतिभावंतांचा सत्कार

## ,राममजित (जितू) गुप्ता याचे उत्कृष्ट नियोजन



कल्याण(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) आदर्श व्यक्तिमत्व, निस्वार्थी सेवा, गरिबांचे कैवारी, समाजसेवक हाच धर्म,असे चतुरस्त्र प्रतिभावंत व्यक्तिमत्व म्हणजे रामजित(जितू) महादेव गुप्ता सर, हे सर्व सामान्यांचे समाजसेवकच.रांजल्या गाजल्यांना मदत करणे हा त्यांचा स्वभाव,त्याच अनुषंगाने कुष्ठरोग पीडित,ऋग्णांच्या मदतीसाठी कल्याण येथील के.एम.अग्रवाल कॉलेज ऑडिटेरियम मध्ये भारत सन्मान पुरस्कार सोहळा2026आयोजित करण्यात आला होता.हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.आकर्षक नृत्य, पुरुष, महिलांसाठी मनोरंजनाचे खेळ, गौरी शिळकर हिचे गणपती वंदना,सुधाकर पाटील बुवा यांचे वासुदेव रुपी नृत्य, समता डान्स अकॅडमीच्या मुलांचा जोगवा,रिलस्टार स्वरा मुंढे हिचे कोळी नृत्य, गायिका मौमिता नायर आणि शर्मिला केसरकर याची श्रवणीय गाणी असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.सर्व सहभागी कलाकारांना बक्षिसांची लयलूट करता आली.सर्व कलाकारांना अँन्टी पायरेसी सेल मुंबई चे मुख्य तपासी अधिकारी राम जित(जितू) गुप्ता यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.सुग्रास जेवणाचा आनंद घेतल्यानंतर पुरस्कार सोहळ्याला सुरुवात झाली.साहित्यिक,कवी, शैक्षणिक, सांस्कृतिक,कला, क्रिडा, सामाजिक, उद्योजक, पत्रकारिता, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रातील प्रतिभावंत प्रज्ञावंतांना प्रमुख पाहुणे इंडियन एअर फोर्सच्या फ्लाइंग ऑफिसर इतिशा चौहान, मानवाधिकार जागतिक मानव कल्याण संस्था पुणे येथील संस्थापिका-अध्यक्षा प्रिती ताई सावंत,भारत विभुषण(गव्हरमेंट ऑफ पंजाब)एमएमआरडीचे स्थापत्य अभियंता डॉ.दिगंबर सिताराम तायडे, अभिनेत्री ए-स्टार टूर्स आणि ट्रॅव्हल्सच्या संस्थापिका अश्विनी अमित चुरी, जेष्ठ समाजसेविका मेहराजुनिसा अब्दुल शकील, श्री समर्पण ट्रस्टचे जितेंद्र जोशी, आदर्श शिक्षिका नसहत अंजुम इफ्तेकार अन्सारी यांच्या हस्ते पुरस्कार्तींना सन्मानित करण्यात आले. रामजित(जितू) गुप्ता सरांच्या सर्वच कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलखेचक खुमासदार पध्दतीने निवेदिका बीना देवधर यांनी केले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन, नियोजन, नाष्टा, पाणी, स्वादिष्ट जेवण याची उत्तम व्यवस्था,एसी हॉल, शिस्तबद्धता,आंनदीमय वातावरण याबद्दल प्रमुख पाहुणे व सर्व पुरस्कर्तींनी राम जित(जितू) गुप्ता सरांचे कौतुक व अभिनंदन केले.

# बदलत्या हवामानामुळे देशासह विदर्भाने तापमानाच्या बाबतीत उच्चांक गाठला;स्वत :ला सांभाळा.

सध्याच्या परिस्थितीत उष्णतामान वाढल्याने देशासह विदर्भात आगडोंब सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.आजच्या परिस्थितीत विदर्भाने तापमानाच्या बाबतीत मोठा उच्चांक गाठल्याचे सर्वत्र उष्णतेचा कहर दिसून येतो.विदर्भातील अकोला शहराने देशात उच्चांकी कमाल तापमानाचा रेकॉर्ड केला असतांना दिनांक 19 तारखेला वर्धा जिल्ह्याने अकोल्याचा रेकॉर्ड मोडून 45 अंश सेल्सिअस एवढी नोंद केली आहे.सध्या राज्यात विदर्भात वाढत्या उष्णतेमुळे आगडोंब उसळल्याचे चित्र आहे.ही अत्यंत भयावह परिस्थिती आहे. राज्यातील 15 जिल्ह्यात 40 हून अधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. राज्यातील उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून विशेषतः विदर्भ विभागात तापमानाने धोकादायक पातळी गाठली आहे.सध्या वर्धा येथे 45 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून हा आकडा सध्या जगातील सर्वाधिक तापमानाच्या नोंदीपैकी एक मानला जात आहे. यावरून आपण समजू शकतो की, देशातीलच नाही,तर जगातील वाढते तापमान धोकादायक पातळी पोहोचले आहेत.याचे मुख्य कारण म्हणजे निसर्गाची हत्या, जंगलतोड,जगातील युद्धजन्य परिस्थिती, औद्योगिकरण, वाढते शहरीकरण, वाढते प्रदुषण आणि अत्याधुनिक सुख-सुविधा यामुळे देशासह जगातील तापमानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज जगात तापमानाच्या बाबतीत देशातील विदर्भाची नोंद झाली असून इथे आगडोंब सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. आज विदर्भातील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -45, वर्धा -45, नागपूर -44.4, अमरावती -44.2, गोंदिया -44.5, यवतमाळ -43.2, ब्रम्हपुरी -43.2, गडचिरोली --43.2 अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत.यामुळे विदर्भ जनूकाय आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे.देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे,तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे हा सर्व प्रकार मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे. विदर्भात हवामान खात्याने एलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे वाढते तापमान पहाता नागरिकांनी आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावी.सुर्याचे अक्राळविक्राळ रुप पहाता नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावे.घरुन निघतांना काणाला व तोंडाला दुपट्टा बांधून निघावे,कॉटनचे कपडे घालावेत,पाणी जास्तीत जास्त प्यावे, थंड पेय घ्यावे,महत्त्वाचे काम असेल तर घराच्या बाहेर निघावे, लहान मुले व वृद्धांना बाहेर निघण्यापासुन सावधगिरी बाळगावी. कारण सुर्याने विदर्भात उष्णतेचे तांडव सुरु केले यापासून स्वतःला सांभाळने आवश्यक आहे.कारण जगात सर्वाधिक उष्णतेच्या बाबतीत विदर्भाची नोंद झाली आहे.अकोला, वर्धा या दोन्ही शहरांचा पारा 45 अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे आणि जगातील उष्ण शहरांच्या पहिल्या दहामध्ये नागपूर, अमरावती सह अन्य दहा शहराचा समावेश आहे.त्यामुळे देशासह विदर्भात जीवघेण्या उष्णतेमुळे सर्वत्र "अदृश्य संचारबंदी" असल्याचे वातावरण दिसून येते.कारण उन्हाच्या चटक्यामुळे सर्वत्र शांततेचे वातावरण दिसून येते.त्यासुळे उन्हापासून स्वतःला सांभाळा,सतर्क रहा, काळजी घ्या.जय हिंद.

**लेखक:रमेश कृष्णराव लांजेवार( स्वतंत्र पत्रकार ) मो.नं.9921690779, नागपूर.**

# जनगणना 2027: विकासाच्या नकाशाला नवी दिशा

## अचूक माहितीच ठरणार सक्षम भारताचा पाया



— डॉ. भारत कऱ्हाड

भारतामध्ये विकासाच्या प्रश्नावर नेहमी चर्चा होत असते. कुठे रस्ते अपुरे, कुठे पाणीटंचाई, तर कुठे आरोग्यसेवा कमी—या सर्व समस्या आपण वारंवार ऐकतो आणि अनुभवतो. मात्र या समस्यांच्या मुळाशी एक मूलभूत प्रश्न दडलेला असतो—सरकारपर्यंत खऱ्या आणि अचूक माहितीचा प्रवाह होतो का? याच प्रश्नाचे उत्तर देणारी सर्वात महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे जनगणना. आगामी जनगणना 2027 ही या दृष्टीने अत्यंत निर्णायक ठरणार आहे, कारण ती केवळ लोकसंख्या मोजण्यापुरती मर्यादित न राहता, भारताच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक वास्तवाचा सखोल आरसा ठरणार आहे.

आजवर आपण जी जनगणना पाहिली, ती मुख्यतः कागदावर आधारित होती. गणक घराघरांत जाऊन माहिती गोळा करायचे, ती नोंदवायचे आणि नंतर त्या माहितीचे संगणकीकरण केले जायचे. या प्रक्रियेला वेळ लागत असे आणि अंतिम आकडेवारी समोर येण्यासाठी अनेकदा दोन ते तीन वर्षांचा कालावधी लागत असे. त्यामुळे त्या माहितीवर आधारित धोरणे तयार होईपर्यंत परिस्थिती काही प्रमाणात बदललेली असे. याउलट, जनगणना 2027 ही पूर्णपणे डिजिटल स्वरूपात होणार असल्याने तिचे स्वरुप अधिक गतिमान आणि परिणामकारक असेल. माहिती थेट मोबाइल किंवा टॅब्लेटद्वारे नोंदवली जाईल, काही प्रमाणात नागरिकांना स्वतः माहिती भरण्याची सुविधा दिली जाईल, तसेच संकलित माहितीवर रिअल-टाइम पातळीवर लक्ष ठेवता येईल. यामुळे प्राथमिक आकडेवारी लवकर उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण होते आणि शासनाला त्वरित निर्णय घेणे शक्य होते.

डिजिटल पद्धतीमुळे स्वयंचलित तपासणी, स्थान माहिती (GPS) आणि इतर तांत्रिक साधनांच्या मदतीने डेटा अधिक अचूक राहण्यास मदत होईल. मात्र या सगळ्या प्रगत तंत्रज्ञानासोबत नागरिकांची जबाबदारीही तितकीच वाढते. कारण आपण दिलेली माहिती जर चुकीची असेल, अपुरी असेल किंवा निष्काळजीपणे दिली असेल, तर त्या माहितीवर आधारित धोरणेही चुकीची ठरु शकतात. त्यामुळे "चुकीची माहिती म्हणजे चुकीचा विकास" हे वास्तव प्रत्येक नागरिकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

जनगणना ही केवळ आकडे गोळा करण्याची प्रक्रिया नसून, ती देशाच्या विकासाचा पाया आहे. शासनाला कुठे किती लोकसंख्या आहे, त्या लोकांना कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाहीत, त्यांचे जीवनमान कसे आहे—याची माहिती जनगणनेतून मिळते. उदाहरणार्थ, एखाद्या गावातील लोकसंख्या प्रत्यक्षात जास्त असताना ती कमी नोंदली गेली, तर त्या गावासाठी आवश्यक पाणीपुरवठा, शाळा, आरोग्य केंद्रे यांची योजना अपुरी पडू शकते. उलट, जास्त लोकसंख्या दाखवली गेल्यास संसाधनांचे चुकीचे वाटप होऊ शकते. त्यामुळे जनगणना ही प्रत्येक नागरिकासाठी हक्क मिळवण्याचे साधन आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

ग्रामीण भारतासाठी जनगणनेचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. आजही अनेक गावांमध्ये पाणी, वीज, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांची कमतरता जाणवते. या समस्या शासनापर्यंत पोहोचवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे जनगणना. गावातील घरांची स्थिती, पाण्याची उपलब्धता, स्वच्छतेची परिस्थिती, शिक्षणाचा स्तर—ही सर्व माहिती योग्य प्रकारे नोंदवली गेल्यास शासनाला त्या भागासाठी प्राधान्यक्रम ठरवणे सोपे जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनी जनगणनेत सक्रिय सहभाग घेणे अत्यंत आवश्यक आहे.

दुसरीकडे, शहरी भारत झपाट्याने बदलत आहे. रोजगाराच्या शोधात मोठ्या प्रमाणावर लोक शहरांकडे स्थलांतर करत आहेत. उपनगरांची वाढ, झोपडपट्ट्यांचे विस्तार आणि अनियोजित वस्ती या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. या बदलांचा अचूक अंदाज जनगणनेतूनच येतो. यामुळे वाहतूक, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर पायाभूत सुविधांचे नियोजन अधिक वास्तववादी आणि परिणामकारक करता येते. त्यामुळे शहरांच्या भविष्यातील विकासासाठीही जनगणना अत्यंत महत्त्वाची ठरते.

जनगणना 2027 चा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिचा लोकशाही व्यवस्थेवर होणारा परिणाम. लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना केली जाते. त्यामुळे लोकसंख्या जास्त असलेल्या भागांना अधिक प्रतिनिधित्व मिळू शकते, तर कमी वाढ झालेल्या भागांना त्याचा परिणाम जाणवू शकतो. यामुळे राजकीय समतोल बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे जनगणना ही केवळ विकासाचा आधार नसून, लोकशाही व्यवस्थेतील समतोल राखण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

डिजिटल प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर डेटा सुरक्षिततेबाबत काही शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. नागरिकांना आपल्या वैयक्तिक माहितीच्या सुरक्षिततेची चिंता वाटणेही साहजिक आहे. मात्र जनगणना कायद्याअंतर्गत नागरिकांची माहिती गोपनीय ठेवली जाते. वैयक्तिक माहिती सार्वजनिक केली जात नाही आणि ती केवळ एकत्रित स्वरूपात वापरली जाते. तरीही, सायबर सुरक्षेच्या दृष्टीने तांत्रिक यंत्रणा मजबूत असणे आवश्यक आहे, कारण नागरिकांचा विश्वास टिकवणे ही या प्रक्रियेची सर्वात मोठी गरज आहे.

जनगणना यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारी यंत्रणा पुरेशी नसते. त्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असतो. प्रत्येक नागरिकाने प्रामाणिकपणे आणि अचूक माहिती द्यावी, जनगणना अधिकाऱ्यांना सहकार्य करावे आणि आपल्या परिसरात इतरांनाही याबाबत जागरूक करावे. जनगणना ही "सरकारची प्रक्रिया" नसून, ती "जनतेची सामूहिक जबाबदारी" आहे, ही भावना समाजात रुजणे गरजेचे आहे.

आज भारत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. या प्रवासात योग्य नियोजन आणि प्रभावी धोरणनिर्मिती यांची गरज अधिक आहे. त्यासाठी विश्वासार्ह आणि अद्ययावत माहिती हा सर्वात महत्त्वाचा आधार आहे. जनगणना 2027 ही त्या दृष्टीने एक ऐतिहासिक संधी आहे. ती भारताला स्वतःकडे नव्याने पाहण्याची, आपल्या गरजा ओळखण्याची आणि भविष्यासाठी योग्य दिशा निश्चित करण्याची संधी देईल.

शेवटी, एवढेच म्हणावेसे वाटते की, जनगणना 2027 ही केवळ आकडे गोळा करण्याची प्रक्रिया नाही, तर ती भारताच्या भविष्यातील विकासाचा आराखडा आहे. आज आपण दिलेली अचूक माहिती हीच उद्याच्या सक्षम भारताची पायाभरणी ठरणार आहे. योग्य माहिती दिली, तरच योग्य विकास घडेल—आणि त्यातूनच सक्षम, समतोल आणि प्रगत भारत निर्माण होईल.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**


# प्राचीन वारसा: वास्तूंचे कसे महत्त्व व संवर्धन?

## (18-24 एप्रिल: जागतिक/ विश्व/ आंतरराष्ट्रीय वारसा दिन/ दिवस विशेष.)

**आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून चालत आला आहे. युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर वास्तुरुपी राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्ताने श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख... संपादक.**

आपल्या समाजमनात प्रौढशिक्षण, लैंगिकशिक्षण या विषयांप्रमाणे प्राचीन वारसावास्तूंचे महत्त्व आणि संवर्धनाबाबत अज्ञान, बेफिकिरी आणि उदासिनता आहे. हा विषय सर्वत्र पोचवायचा असेल तर दृकश्राव्य माध्यमाबरोबर साध्यासोप्या भाषेतून त्यावर विपुल लेखन होणे गरजेचे आहे. तरच संस्कारक्षम विद्यार्थ्यांपासून, अशिक्षित, असंस्कृत पर्यटकांना त्याची जाण येईल. पाश्चिमात्य राष्ट्रांसह इजिप्तसारख्या पुरातन वास्तूवैभवाच्या देशातील वारसासंवर्धनाच्या जाणीवेची उणीव आपल्याकडे प्रकर्षाने जाणवते. आमची अलौकिक कलाकृतीची मंदिरे ही फक्त धार्मिक ठिकाणच नव्हती, तर सभोवतालचा समाज एकसंघ राहण्यासाठी ती शैक्षणिक, सांस्कृतिक केंद्रे होती. हे आम्ही ध्यानात का घेत नाहीत? या मंदिरवास्तूंच्या व्यासपीठावरुन नृत्य, किर्तन, गायन, प्रवचन, भारुड, पाठशाळा यांच्याबरोबर प्रांगणात आठवडी बाजार, जत्रा, मंडई उपक्रम राबवले जात होते. बरोबरीने न्यायनिवाडा करण्याचे ते एक समाजमान्य न्यायालयही होतेच. याशिवाय मंदिर माध्यमाद्वारे वाद घालून संवाद साधण्याचे हे लोकांचे एक हक्काचे ठिकाण होते. तर व्याख्यान, प्रवचनांद्वारे लोकोपयोगी माहिती पुरवण्याचा परिपाठ तर वाखाणण्याजोगा होता. आता हे सारे इतिहासजमा होताहेत, याचीच मनाला खंत वाटते!

पृथ्वीवर जशी काळानुरुप नैसर्गिक स्थित्यंतरे सतत घडत असतात, तशी अनेक क्षेत्रात मानव निर्मित घटकांतही परिवर्तन घडत असते. त्यात कला क्षेत्राप्रमाणे सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक क्षेत्रातही बदल घडत असतात. त्यात मानवाने आपल्या संस्कृतीचे मापदंड गणल्या जाणाऱ्या कलाकृती निर्माण केल्यास त्यांना इतिहासाच्या पाऊल खुणांबरोबर धार्मिक अधिष्ठानासह सांस्कृतिक मोलही आहे. त्यातील काहींना राष्ट्राच्या अस्मितेची शान आहे. त्यात गडकोट, कमानी, राजवाडे, मनोरे, विजयस्तंभ प्रशासकीय इमारती आदींचा समावेश आहे. हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या धर्माच्या आधारावर, तत्त्वप्रणालीनुसार लेणी, स्तुप, मंदिर, चर्च, मशीदी, मनोरे, कमानी उभारल्या, त्या वारसा वास्तु गणल्या गेल्या. लिखित स्वरुपाच्या इतिहासाबरोबर या राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे, हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करुन देण्यासाठी युनेस्कोतर्फे 18 एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून आहे. वारसा वास्तुप्रकारात मंदिर वास्तूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यावरील कलाकृती ही पर्यटक, अभ्यासकांना भूरळ घालणारी आहे. परंतु दुर्दैवाने या बऱ्याच मंदिरांसह, लेण्या, गुहामंदिरे, गडकोट, कमानी यांची आजची अवस्था दयनीय असून त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. आता नवीन मंदिरे उभारताना त्यावर मार्बल, ग्रेनाईट आदींचा साज चढवून ते सुशोभित करण्याच्या प्रयत्नात त्यांचा मूळ ढाचा, बाज, प्राचीन स्थापत्य कौशल्य नाहीसे होत चाललेय. त्यामुळे आमचा प्राचीन बांधकाम वारसाच नष्ट होतोय. आर्थिक पाठबळाच्या आधारावर नवीन मंदिरवास्तू उभारताना ज्या नवीन मंदिरवास्तू उभारल्या जाताहेत, पण प्रादेशिक वास्तुकलेच्या प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे. आधुनिकपणा बरोबर नावीन्याची कास धरताना आम्ही आमचा वैभवशाली वारसा विसरत चाललोय हेच यातून जाणवते.




भारतातील प्राचीन संस्कृती दर्शवणाऱ्या वारसावास्तू, लेण्या, स्तुप आदी पाहण्यासाठी जगभरचे पर्यटक, अभ्यासक येत असतात. मात्र इतिहासाचे मापदंड ठरलेल्या या घटकांच्या संवर्धनाची समाजात व शासकीय पातळीवरही जाणीव नाही, दुर्दैव! याकडे होणारे दुर्लक्ष अक्षम्य असून भावीकाळात हा राष्ट्रीय ठेवा इतिहासजमा होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. परिसराचा विकास साधताना, धरण प्रकल्प निर्माण होताना प्राचीन वास्तूंना जलसमाधी का लाभली? याचे कुणालाच सोयरसुतक नाही. आपल्याकडे पुरातत्त्वखाते कायम उपेक्षितच राहिले आहेत. वारसा स्थळांच्याद्वारे प्राप्त होणारा महसूल अत्यल्प असेल, या कारणाने या खात्याकडे गांभीर्यानेही पाहिले जात नाही. देशातील वारसावास्तूंची संख्या आणि त्यांच्या संवर्धनासाठी मंजूर निधी, याचे प्रमाण तर हास्यास्पद आहे. लोप पावलेल्या अज्ञात संस्कृतीला जनमानससमोर आणून तिच्या इतिहासासह त्यावेळच्या समाजजीवनावर प्रकाश झोत टाकण्याचे काम पुरातत्त्व अभ्यासाद्वारे होत असते. हेच पुरातत्व शास्त्राला अभिप्रेत आहे. इ.स.1784मध्ये आपल्या देशात एशियाटिक सोसायटीची स्थापना करून पुरातत्व शास्त्राचा पाया घातला गेला. त्याला शास्त्रीय अभ्यासाची जोड देण्यासाठी 1860 साली आर्किऑलॉजिकल सव्हे ऑफ इंडिया ही अस्थापना स्थापन करुन ब्रिटिश प्रशासकांनी पुरातत्वखात्याला प्रोत्साहन दिले होते. ग्रामीण भागात प्राचीन मूर्ती विरघळत, शिलालेख रस्त्याच्या कडेला उनपावसात तडाखे सोसत उभे आहेत, तर काही वारसा वास्तूंचे अवशेष आपल्या घरांच्या पायऱ्यासाठीही वापर करुन आपली गरज भागविली जात आहे. येथील काही किल्ले, लेण्या, स्तंभावर खडू-कोळशाने आपले नाव ठळकपणे लिहून आपण या ठिकाणी आपल्या मैत्रिणींसह भेट दिल्याचा पुरावा दर्शवणाऱ्या खुणा पाहून पर्यटकांच्या असंस्कृतपणाची कीव करावीशी वाटते. खरं तर, ही पुरातन कलाकृती निर्माण करणारे कलाकार अज्ञात आहेत, परंतु असले आचरटाचार्य पर्यटक सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी या वास्तूसौंदर्याला बाधा आणतात. जसा निसर्गाचे मोल जाणणारा पर्यटक वनपर्यटनाला हवा आहे, तसाच वारसा वास्तूचे मोल जाणणारा अभ्यासूपर्यटक असेल, तरच या राष्ट्रवैभवाचे संवर्धन होईल. भूकंपासारख्या आपत्तीतही काही प्राचीन मंदिर वास्तूंवर परिणाम झाला नाही तेव्हा पूर्वीच्या बांधकाम तंत्रज्ञानाचा अभ्यास करून या शास्त्राच्या आधारावर इमारती बांधकामाचे तंत्रज्ञान विकसित करण्याचा विचारही आम्हाला सूचत नाही.

खोदकाम करताना अनेकदा जुन्या वस्तू, मूर्ती आढळतात. त्या शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायत तालुका तहसिलदार यांच्याकडे जमा करून अखेरीस प्रत्येक जिल्हा पातळीवर चांगले वस्तुसंग्रहालय निर्माण होणे शक्य आहे. पण सरकारी जाच-काच व नियमांचा कोलदांडा टाकण्यासाठी याची कुठेच नोंद होत नाही. त्यासाठी सुजाण नागरिकांबरोबर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, पण हा ठेवा जतन करण्यासाठी अभ्यासू लोकप्रतिनिधी व प्रशासकांची आवश्यकता आहे. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वारसा वास्तू दर्शन सहलींचे हेरिटेज वर्क आयोजन करून या वारसावास्तू स्थळदर्शनाद्वारे या अनमोल ठेव्याचे संवर्धन करणे कसे आवश्यक आहे, हे त्यांच्या मनावर बिंबवता येईल. त्यासाठी प्रथमत: त्यांच्या अभ्यासक्रमातच या विषयाचा समावेश करावा लागेल. बऱ्याचदा सहल व्यवस्थापक गाईडची भूमिका पार पाडतो. आयोजित सहलीचे वेळापत्रक सांभाळणारा हा व्यवस्थापक वारसा वास्तू अभ्यासक, मार्गदर्शक असेलच असे नाही. तो स्थानिक मार्गदर्शकांकडे पर्यटकांच्या गटाला सोपवून मोकळा होतो. यासाठी सहल व्यवस्थापकानाच वारसावास्तू मार्गदर्शनाचे प्रशिक्षण हवे. बऱ्याच पर्यटकांना वारसा स्थळ दर्शनापेक्षा भोजन खरेदीतच जास्त स्वारस्य असते. अनेक वारसावास्तू स्थळ दर्शनात अधिकृत मार्गदर्शकच नसतो आणि जो स्थानिक स्वयंघोषित मार्गदर्शक असतो, ती तर प्रचलित दंतकथा सांगत या ठिकाणी कोणत्या चित्रपटांचे छायाचित्रण झाले हे सांगण्यात धन्यता मानतो व ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी धन्यता मानतो. ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी लागल्याचं समाधान घेऊन भोजन- खरेदीसाठी तत्परतेने परततील. किंवा या स्थळाची आजची अवस्था पाहून सरकारी यंत्रणेला दोष देत काही वेळ हळहळतील, पण याच ठिकाणी आडोशाला मद्यपानाचा आस्वाद घेऊन सहलीचा आनंद द्विगुणीत करतील. फार तर घरी परत त्यावर एखाद्या वृत्तपत्रातून त्या वारसा स्थळाच्या आजच्या सोचनीय स्थितीबद्दल पत्र प्रसिद्ध करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडल्याच समाधान मानणारे पर्यटक भरपूर आहेत.

वैयक्तिक छंद म्हणून काहींनी स्वतःचे वस्तुसंग्रहालय उभारले आहे. त्यांना शासकीय मान्यतेसह अनुदान दिल्यास प्राचीन वारसा संवर्धन कामाला प्रोत्साहन मिळेल. काही कुटुंबांकडे जुनी शस्त्रे, वस्तू आहेत त्यांनाही मदतीसह आवाहन करून हा ठेवा संग्रहालयात सुपूर्द करण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास संग्रहालयात त्याचे योग्य जतन होईल. सक्षम ज्येष्ठ नागरिकांच्या ज्ञानासह त्यांच्या क्षमतेचा उपयोग करून घेतला जात नाही. इतिहास, प्राचीन वास्तू, संस्कृती यात गती असलेल्या ज्येष्ठांना मार्गदर्शक म्हणून काम करण्याची तयारी असूनही त्यांच्या आवाहनाला शासन दरबारी प्रतिसाद नाही. काही वारसा वास्तूसमुहाची परिक्षेत्र व्याप्ती मोठी असते, तेव्हा प्रवेश द्वारीच मार्गदर्शक नकाशा व संक्षिप्त माहितीफलकच नसतो आणि जो असतो तो वाचणे अशक्य असते. मात्र असल्या स्थळी प्रवेश शुल्क तत्परतेने आकारले जाते. आता मानवनिर्मित वारसा कलाकृती बरोबर काही नैसर्गिक स्थळांची दखल युनेस्कोने घेऊन त्यांचाही जागतिक वारसा स्थळात समावेश केला आहे. त्यात महाराष्ट्रातील पश्चिम घाट क्षेत्रातील चार स्थळांचा समावेश झाला आहे. परंतु या अजस्त्र घाटमाथ्यावरील निसर्गराजा जसा आम्हाला खचितच क्षमा करणार नाही, तसेच वारसा वास्तूसंवर्धनाची उपेक्षाही हेच सांगते, हे विशेष!

!! विश्व वारसा दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

**(दिनविशेषकार.)**
**रा.श्रीगुरुदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**
**फक्त व्हॉट्सअॅप- 9423714883.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

रक्षणासाठी ठोस पावले उचलावी लागतील.

‘वसुंधरा रक्षक अभियाना’च्या माध्यमातून राज्यभर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांसारखे ‘वसुंधरा वॉरियर्स’ तयार केले जाणार आहेत. गावागावांत, वॉर्डावॉर्डात ही चळवळ पोहोचली पाहिजे. हे रक्षक प्रदूषणाविरुद्ध लढतील. प्रत्येक नागरिकाने झाडे लावणे, कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा वापर कमी करणे अशा कृतींमधून सर्व नागरिकांनीही वाटा उचलावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रदूषणाचा परिणाम प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची तीव्रता जाणवत नाही. लोकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम पाहून बदलाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याचे सांगून आजच्या पिढीला पर्यावरणातील बदल समजावून सांगण्यासाठी ‘आज-काल-उद्या’ या संकल्पनेवर आधारित माहिती आणि डेटा उपलब्ध करून दिला जाईल. आजची पिढी तंत्रज्ञानात पुढे आहे; मात्र पर्यावरणाची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. पुढच्या पिढीला संपत्ती नव्हे, तर स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे.

‘महा-आरपीईटी’ अभियानाबाबत मंत्री पंकजा मुंडे यांनी प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्वापरावर भर देत ‘रिड्यूस, रियूज, रिसायकल आणि रिथिंक’ या तत्वांचा अवलंब करण्याचे आवाहन केले. अनावश्यक पॅकेजिंग कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि पुनर्निर्मितीला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून त्याचा उत्पादकांकडून पुन्हा वापर करण्याची संकल्पना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. राज्यात या प्रकारचा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

औद्योगिक प्रदूषण नियंत्रणासाठी राबविण्यात येणाऱ्या उत्सर्जन व्यापार योजना इमिशन ट्रेडिंग स्कीमबाबत मंत्री मुंडे यांनी सांगितले की, कार्बन ट्रेडिंगप्रमाणेच सल्फर डायऑक्साईड उत्सर्जन नियंत्रणासाठी ही योजना महत्त्वाची आहे. उद्योगांनी उत्सर्जन कमी करण्यासाठी परस्पर सहकार्याचा मार्ग स्वीकारल्यास पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेल.

वसुंधरा रक्षक व्हॉट्सॲप कम्युनिटीमुळे तरुणांपर्यंत पर्यावरणविषयक संदेश प्रभावीपणे पोहोचेल – प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम

प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी सांगितले की, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून त्याची सुरुवात आजच्या कार्यक्रमातून होत आहे. ‘वसुंधरा रक्षक’ व्हॉट्सॲप कम्युनिटीसारख्या उपक्रमांमुळे विशेषतः तरुण पर्यावरणविषयक संदेश प्रभावीपणे पोहोचवला जाणार आहे. ‘महा-आरपीईटी’ धोरणांतर्गत उत्पादकांनी स्वतः निर्माण केलेल्या प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे ही महत्त्वाची पायरी आहे. हा उपक्रम देशातच नव्हे तर जगातही आगळावेगळा असल्याचेही त्यांनी सांगितले.

देशातील पहिली सल्फर डायऑक्साईड इमिशन ट्रेडिंग योजना महाराष्ट्रात सुरु होत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. सध्या राज्यातील सुमारे 100 उद्योग या प्लॅटफॉर्मवर सहभागी झाले असून भविष्यात याचा विस्तार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण संरक्षणासाठी डेटा व कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांचा वापरही पुढील काळात करण्यात येणार आहे. प्रशासनासोबतच उत्पादक आणि नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांनी सांगितले की, जागतिक वसुंधरा दिन हा केवळ निसर्गाशी संबंधित विषय नसून तो सार्वजनिक आरोग्य, जीवनमान, शाश्वत विकास आणि पुढील पिढीच्या भवितव्याशी थेट जोडलेला आहे. आजचा दिवस आपल्याला थांबून विचार करण्याची आणि अधिक हरित व जबाबदार भविष्यासाठी आपली बांधिलकी दृढ करण्याची संधी देतो. महा आरपीटी अभियान हे प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. ‘वसुंधरा रक्षक’ उपक्रमाद्वारे विद्यार्थी, तरुण, महिला आणि नागरिकांना शाश्वत जीवनशैलीशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

‘अवर पॉवर, अवर प्लॅनेट’ या यंदाच्या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद केवळ धोरणांत नसून नागरिक, संस्था आणि समाजाच्या दैनंदिन निर्णयांमध्ये दडलेली असल्याचे स्पष्ट केले.

वसुंधरा रक्षक अभियानाअंतर्गत वसुंधरा रक्षक व्हॉट्सअप कम्युनिटी तयार करण्यात आली आहे. या कम्युनिटीद्वारे या अभियानामध्ये सहभागी होता येणार आहे. या कार्यक्रमात क्यूआर कोडद्वारे मंत्री पंकजा मुंडे, एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश कदम व सचिव जयश्री भोज यांनी या कम्युनिटीमध्ये सहभाग नोंदवत वसुंधरा रक्षक झालो असल्याचे जाहीर केले. तसेच वसुंधरा अभियानाच्या लिंक व क्यूआर कोडद्वारे या अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी केले.

संजय भुस्कुटे यांनी सूत्रसंचालन केले. वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे यांनी स्वागत केले.

---

सक्रिय राजकारणाला जणू ‘ब्रेक’ लागला होता, ज्याने अनेकांना चक्रावून टाकले होते.निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंकजा मुंडे यांनी प्रीतम मुंडे या गेवराई आणि माजलगाव मतदारसंघाची धुरा सांभाळतील असे म्हटले होते, तरीही त्या राजकीय पटलावर म्हणाव्या तशा सक्रिय दिसत नव्हत्या. मात्र, आता प्रभारी म्हणून झालेल्या या नियुक्तीने त्या पुन्हा एकदा ‘ॲक्शन मोड’मध्ये परतल्या आहेत.पक्षाने केवळ बीडपुरते मर्यादित न ठेवता प्रीतम मुंडे यांचा उपयोग मोठ्या स्तरावर करण्याचे ठरवले आहे. भाजपच्या नव्या संघटनात्मक बदलांमध्ये त्यांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पश्चिम विभागाचे प्रभारी बनवण्यात आले आहे. ही नियुक्ती म्हणजे त्यांच्या नेतृत्वावर पक्षश्रेष्ठींनी दाखवलेला मोठा विश्वास मानला जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगरसारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याची जबाबदारी त्यांच्याकडे येणे, हे त्यांच्या राजकीय वजनाचे निदर्शक आहे.प्रीतम मुंडे या थेट जनसंपर्क आणि धाडसी निर्णयांसाठी ओळखल्या जातात. दोन वर्षांनंतर त्यांना संघटनात्मक पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याने बीडसह मराठवाड्यातील त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये समाधानाची लाट पसरली आहे. उशिरा का होईना, पण ताईंना योग्य न्याय मिळाला, अशी भावना अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.आता डॉ. प्रीतम मुंडे या छत्रपती संभाजीनगरमध्ये संघटना कशी बांधतात आणि आगामी काळात त्यांचा बीड जिल्ह्याच्या राजकारणात कसा सहभाग राहतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पुनर्वसनामुळे मुंडे भगिनींच्या राजकीय ताकदीला नवा जोम मिळाल्याचे बोलले जात आहे.

---

सततच्या पराभवामुळे कदाचित काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेजी यांच्या डोक्यावर परिणाम झाला असावा, त्यामुळे राष्ट्रभक्त, देशभक्त आणि ज्यांनी सुरक्षित व अधुनिक भारत तयार केला, त्या मोदीजींबद्दल त्यांनी अशाप्रकारचे अपशब्द वापरले आहेत. काँग्रेसची नीतीच राहिली आहे. हा तोच काँग्रेस पक्ष आहे, ज्यांनी मोदीजींना मौत का सौदागर असं म्हटलं होतं. परंतु ते जेव्हा -जेव्हा मोदींवर हल्ला करतात त्या-त्या वेळी जनता त्यांना उत्तर देते आणि त्या-त्या वेळी जनता त्यांना पराभूत करते. देशाच्या पंतप्रधानांबद्दल त्यांनी केलेलं विधान याचा आम्ही निषेध करतो. त्यांनी आपलं वक्तव्य परत घेऊन, जाहीर माफी मागवी अशा प्रकारची मागणी आम्ही या ठिकाणी करतो, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.दरम्यान दुसरीकडे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी देखील मल्लिकार्जुन खर्गे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे, त्यांनी ट्विट करत निशाणा साधला. ‘कावीळ झालेल्याला सगळं जगच पिवळं दिसतं! ज्यांच्या राजवटीत दहशतवाद्यांना रान मोकळं मिळालं होतं, त्यांना आता दहशतवादमुक्त नव्या भारतातही सगळे दहशतवादीच दिसतायत. खर्गे साहेब, दुसऱ्याला दोष देण्यापूर्वी दहशतवाद्यांवरच्या ‘मोहब्बत’ने सजलेला काँग्रेसचा इतिहास एकदा वाचाच !’ असं ट्विट रवींद्र चव्हाण यांनी केलं आहे.

---

दरम्यान, राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार भोगवटादार वर्ग – 2 मधून भोगवटादार वर्ग – 1 मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना. याबाबतची अधिसूचना काढण्यास मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. महसूल विभागाच्या निर्णयावर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. महसूल विभागात 1980 पासूनची मागणी होती. □जी जमीन स्वातंत्र्य सैनिकांना दिलेली होती, ती त्यांच्या शेतकरी मुलांना देण्याचा निर्णय घेतला आहे. □वर्ग 2 ची जागा वर्ग 1 होणार आहे. 50 लाखांपर्यंत ज्याची किंमत आहे, ते अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्यावरचे मंत्री यांना अधिकारी असतील. सातारा जिल्ह्यातील 42 हेक्टर जागा आयटी पार्कसाठी देण्यात आली आहे. देवस्थान इनाम जमीन प्रश्न आहे. □या संदर्भात एक कायदा आणायचा आहे, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण (सिबीजी), 2026 जाहीर करण्यात आलं आहे. प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समिती, बायोगॅस प्रकल्प पीपीपी, हायब्रीड अन्युईटी तत्वावर राबवणार. यावर्षासाठी पाचशे कोटींची तरतूद. घनकचऱ्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन, हरित गृह वायू उत्सर्जन कमी होणार आहे.

राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन मिळणार. या पदावरील शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्त गुण मिळणार.

सातारा जिल्ह्यातील मौजे नागेवाडी येथे आय. टी. पार्कला जमीन देण्याचा निर्णय. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास 42. 55 हेक्टर जमीन देण्यात येणार. सातारा जिल्हा आणि परिसरातील आयटी क्षेत्राला प्रोत्साहन, युवकांना रोजगार – व्यवसायाच्या संधी.राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार भोगवटादार वर्ग – 2 मधून भोगवटादार वर्ग – 1 मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना. याबाबतची अधिसूचना काढण्यास मान्यता.

---

आणि राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत विविध प्रलंबित कामे, भूसंपादन, निकृष्ट दर्जा, अपघातप्रवण ठिकाणे व नागरिकांच्या अडचणी यांसह सर्वच मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे यांनी बैठकीत अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा व माजलगाव शहरांभोवती बायपास व उड्डाणपूल उभारण्याचा मुद्दा उपस्थित केला. अपघातप्रवण ठिकाणांची तातडीने दुरुस्ती, पिंपळा धायगुडा-लोखंडी सावरगाव-केज-मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी करणे, तसेच अंबाजोगाईतील यशवंतराव चव्हाण चौकात फूटओव्हर ब्रिज उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. सुरत-चेन्नई राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची सद्यस्थितीही तपासण्यात आली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी-गढी-माजलगाव मार्गावरील खराब रस्त्यामुळे होत असलेल्या अपघातांबाबत तक्रारी येत आहेत. तालखेड फाटा, श्रृंगारवाडी फाटा यांसह विविध ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. माजलगाव-धारूर-केज (रामा 548 सी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब असल्याने संबंधित एजन्सीकडून तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. धारूर घाटातील थेटेगव्हाण पर्यायी मार्ग, तसेच बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरीकरणाच्या निविदांबाबत माहिती घेण्यात आली. पाटोदा व आष्टी तालुक्यातील अंमळनेर-टाकळी काजी तसेच गेवराईतील राक्षसभुवन फाटा-उमापूर-शेवगाव या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

---

मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. माधव रोडे म्हणाले , डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शिक्षण हेच प्रगतीचे मुख्य साधन आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, स्वतःचा सन्मान कायम ठेवा, व्यसनांपासून दुर रहा. सहकार्याची भावना ठेवा, संयमी व्हा , हार मानू नका , आयुष्यात परिस्थिती कितीही कठीण असली तरी इच्छा शक्ती व मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते. आपली जगण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत मग शिका ! जिद्दी ठेवा ! संघर्षांची तयारी सह संयम ठेवा असे प्रा. माधव रोडे यांनी आपले मत मांडले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.विजय मुंडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय संविधानतून प्रत्येक नागरिकांना समान अधिकार दिले. भारतीय संविधानानेच राष्ट्रीय एकात्मा टिकून आहे. संविधान म्हणजे तुमचा माझा सर्व भारतीयांचा जगण्यातला श्वास आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. तर ॲड . सुनिल सोनपिर यांनी बुद्ध धम्म आणि बाबासाहेब यांचावर धम्मा प्रभाव धम्म मुल्यांवर प्रकार टाकला .

यावेळी उपस्थित विश्वंभर धायगुडे वाल्मीक सलगर रावसाहेब शिंदे प्रभाकर डिगोळे अंगद शिंदे अविनाश फड राम वावळे शिवाजी साळवे पिंटू डिगोळे रंजीत वलेकर जयंती कमिटीचे दादाराव वावळे भगवान साळवे दीपक बडसिंग वैभव पोटभरे धीरज वावळे अमर वावळे रणजीत वावळे, मनोहर व्हावळे, भानुदास व्हावळे प्रतीक साळवे बाबा वावळे पवन साळवे धम्मानंद वावळे मुंजा हरी वाबळेआधी सह महिला पुरुष उपासक उपासिका उपस्थित होते

---

वृक्षारोपण करतांना व्यक्त केले आहे.

शहरातील शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण उपक्रम राबविणारी म्हणून ओळख असलेल्या विद्यानिकेतन सीबीएससी स्कूल येथे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त बुधवार दि. 22 एप्रिल रोजी वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडले. याप्रसंगी नगर परिषद शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभ हस्ते शाळेच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. “वृक्षांचे संवर्धन केले तरच निसर्गाचा समतोल राहील,” असे प्रतिपादन योगेश मेनकुदळे यांनी केले. त्यांनी मराठवाडा व बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, वाढते शहरीकरण आणि मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड याबाबत चिंता व्यक्त केली. या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पाणी बचत, ऊर्जा संवर्धन, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकचा वापर टाळणे तसेच सौर ऊर्जेचा वापर वाढवणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना “एक पाऊल हिरवाईकडे... एक वचन वसुंधरेसाठी!” या संदेशातून पर्यावरण रक्षणाचा संकल्प करण्यात आला. शाळेच्या परिसरात लावलेली रोपे ही केवळ झाडे नसून भविष्यासाठीची आशा व पुढील पिढ्यांसाठीचा अमूल्य ठेवा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. “आज एक झाड लावा, उद्या हजारो श्वास वाचवा!” या घोषवाक्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य संदिप सर, शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यानिकेतन सीबीएससी स्कुल येथे वृक्षारोपण करत विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धनाचे महत्व पटवून दिले. विद्यानिकेतन स्कूल शाळेच्या परिसरात असलेल्या भव्य प्रगणात विद्यार्थ्यां सोबत सभापती योगेश मेनकुदळे व शिक्षक, विद्यार्थी या सर्वांनी वृक्षारोपन करून त्याचे महत्त्व पटवून दिल्याबद्दल विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान वृक्ष रोपन करून त्याचे संवर्धन करा. पर्यावरणाचा समतोल टिकून ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यक्ता आहे. बाल वयापासूनच याबाबत जनजागृती होण्यासाठी व भावी आयुष्यात एक जबाबदार नागरीक होण्याची शिकवण विद्यानिकेतन सीबीएससी स्कुल मधून मिळत आहे. तरी प्रत्येक नागरिकांनी एक वृक्ष लागवड करून वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन नगर परिषद शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे यांनी केले.

---

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणात उपवर्गीकरणाच्या नावाखाली अनुसूचित जातीतील महार,मांग, चांभार आदी जातीमध्येच भांडणे लावण्याचा व घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारालाच छेद देण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण हा भाजपा आणि आर.एस.एस.चा अजेंडा असून त्यांचे हे षडयंत्र म्हणून पाडण्यासाठी परळी तालुक्यातील तमाम आंबेडकरवाद्यांचे व महार,मांग,चांभार यांचे एक महत्त्वपूर्ण चर्चासत्र दिनांक 24 एप्रिल रोजी दुपारी 12 वाजता चेमरी रेस्ट हाऊस येथे आयोजित करण्यात आलेली आहे या बैठकीस आपण उपस्थित राहावे असे आवाहनही निमंत्रक मिलिंद घाडगे, जिल्हा महासचिव वंचित बहुजन आघाडी ,जिल्हा बीड यांनी केले आहे.

---

आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. यावर्षीचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा सकाळी 8.52 वा. दर्शन मंडप वैद्यनाथ मंदिर परळी वै. येथे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चार व विधीपुर्वक संपन्न झाला. या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या 19 बटूंवर उपनयन संस्कार करण्यात आले. यावेळी भागवत कथा प्रवक्तातथा प्रसिद्ध कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह. भ. प. बाळू महाराज उखळीकर यांचे अशिर्वचन झाले . यावेळी उपनयन संस्कारांचे महत्त्व त्यांनी विशद केले. यावेळी माजलगाव येथील अनंतशास्त्री महाराज यांचीही उपस्थिती होती.तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, आदी उपस्थित होते.दोन दिवस हा सोहळा अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सकाळी मातृकापुजन झाले. त्यानंतर उपनयन संस्काराचा मुख्य सोहळा पार पडला. या सोहळ्याचे पौरोहित्य मनोहरदेव जोशी व ब्रह्मवृंदांनी केले. सर्व बटूंची दर्शन मंडप ते प्रभू वैद्यनाथ मंदिर अशी भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. सनई चौघडा, मंत्रोच्चार व समाजबांधवांची प्रचंड उपस्थिती यामुळे परिसर दणाणून गेला होता.

या सोहळ्यात सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने परळीच्या नगराध्यक्षपदी लोकनिर्वाचित झालेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्याचबरोबर नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, देवीप्रसाद उर्फ राजाभय्या पांडे दीनदयाळ बँकेचे व्हाईस चेअरमन एडवोकेट राजेश्वर देशमुख,दीनदयाळ बँकेचे संचालक डॉ. विवेक दंडे, वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रकाश जोशी यांचा सन्मान सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने या सोहळ्यात करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राह्मण बहुउद्देशीय सभा परळीचे अध्यक्ष शरदराव कुलकर्णी हे होते. सूत्रसंचालन प्रा. रविंद्र जोशी , अजय जोशी यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वैजनाथ चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

दरम्यान, यावेळी सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या गौरव सोहळ्यानिमित्त सत्काराला उत्तर देताना परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी ब्राह्मण बहुउद्देशीय सभेच्या अविरत 46 वर्षाच्या या उपनय संस्कार उपक्रमाचे कौतुक केले. सामाजिक एकता व धार्मिक संस्कार जतन करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम उपयोगी ठरतात असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे या सोहळ्यात नगराध्यक्षा म्हणून माझा सकल ब्राह्मण समाजाने केलेला हा सन्मान माझा व्यक्तिगत सन्मान नसून तो तमाम परळीकरांचा सन्मान असल्याची आपली भावना असल्याची कृतज्ञता यावेळी त्यांनी व्यक्त केली.

हिंदू धर्मात सोळा संस्कारांचे महत्त्व आहे.अध्यात्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या या संस्कारांचे पालन करणे महत्त्वाचे मानले जाते. देव, देश आणि धर्म पालनाचे संस्कार यातून रुजवले जातात. धार्मिकदृष्ट्या तर अनन्यसाधारण महत्त्व असलेले हे संस्कार सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे ठरतात. या सोळा संस्कारांपैकी एक उपनयन संस्कार होय. त्यामुळे हे सोहळे आयोजित करणे अत्यंत गरजेचे असते. असे प्रतिपादन ह.भ.प. बाळू महाराज उखळीकर यांनी यावेळी केले.

---

## पान 4 वरुन

अल्पभूधारक व आदिवासी शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती ही उत्पन्नवाढीची प्रभावी संधी ठरू शकते, या उद्देशाने हे प्रशिक्षण विशेष महत्त्वाचे मानले जात आहे. जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून “प्रति एकरी एक लाखांहून अधिक वार्षिक उत्पन्न” हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ग्लोबल विकास ट्रस्ट कार्यरत आहे. आजपर्यंत 5,000 हून अधिक गावांतील 30,000 पेक्षा जास्त शेतकरी या उपक्रमाशी जोडले गेले असून, सुमारे 7 कोटी फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळत असतानाच शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ होत आहे.

सिरसाळा येथील “कृषीकुल” हे जागतिक दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र असून, येथे फळबाग लागवड, जल व मृदा संधारणा तसेच रेशीम शेतीचे सखोल व प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि कोकण विभागांसह गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी येथे प्रशिक्षण घेऊन आधुनिक शेतीत यश संपादन केले आहे.

---

महाराष्ट्राच्या माजी आरोग्यमंत्री स्व. विमलताई मुंदडा यांनी प्रयत्नपूर्वक अंबाजोगाईत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करून आणले होते. यामुळे अंबाजोगाईसह सहा तालुक्यातील वाहनधारकांची मोठी सोय झाली होती. सुरुवातीपासून हे कार्यालय भाड्याचे जागेत सुरु होते. त्यानंतर स्व. विमलताईंच्या सुनबाई नमिता मुंदडा यांनी शासनदरबारी पाठपुरावा करून या कार्यालयाला भव्य आणि सुसज्ज वास्तू मिळवून दिली आहे.

नुकतेच हे कार्यालय स्वतःच्या नूतन वास्तूत स्थलांतरित झाले आहे. दरम्यानच्या काळात आमदार नमिता मुंदडा यांनी भविष्याच्या दृष्टीने कार्यालयाचे विस्तारीकरण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांनाही आत यश आले आहे. या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी शासनाने 15 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

या नवीन मंजुरीनुसार इमारतीचा स्टिल्ट फ्लोअर आणि पहिल्या मजल्याचे बांधकाम केले जाणार असून यामध्ये फर्निचर, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, विद्युतीकरण आणि सौर ऊर्जा यंत्रणा बसवण्यासारख्या कामांचा समावेश आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीला संरक्षक भिंत, अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ते, वाहनतळ शेड आणि मुख्य प्रवेशद्वारासाठी पुलाचे बांधकाम देखील करण्यात येणार आहे.

दिव्यांगांसाठी रॅम्प आणि लिफ्टची सुविधा तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग व सोलर रूफटॉप यंत्रणा उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. मुंदडा यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

---

वातावरण अधिकच ढवळून निघाले आहे. खरे कोण आणि खोटे कोण? याबाबत गावात जोरदार चर्चा रंगू लागली आहे.

मस्साजोग ग्रामपंचायतीच्या या पोटनिवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, सहानुभूतीचा मुद्दा,विकासाचा मुद्दा आणि आता दबावाच्या आरोपांचा मुद्दा या तिन्ही गोष्टींमुळे निवडणूक अधिकच रंगतदार आणि निर्णायक बनली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर सुरु झालेली ही निवडणूक केवळ सरपंच पदासाठी नसून प्रतिष्ठेची लढाई बनली आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या धुरळ्यातून मतदार कोणावर विश्वास ठेवतात, हे निकालात स्पष्ट होणार आहे.

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी न्याय मिळवण्यासाठी मी शेवटपर्यंत लढा देणार आहे. तसेच त्यांनी पाहिलेली गाव विकासाची स्वप्ने पूर्ण करण्यासाठीच मी निवडणुकीच्या मैदानात उतरलो आहे. त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा पुढे करत मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्यावर कोणताही दबाव नव्हता. मी स्वतःच्या इच्छेने निवडणूक लढवत आहे, असे त्यांनी स्पष्ट करून उमेदवारीमागे धनंजय देशमुख यांनी दबाव आणल्याचा आरोपही करण्यात आला होता. मात्र या आरोपात काहीही तथ्य नसल्याचे त्यांनी सांगितले .

---

आल्या आहेत.

मॅट ने कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी एकाच जागी 5 वर्ष हा निकष आहे, मात्र स्वग्राम आणि खंडित अखंडित सेवा असे निकष लावता येणार नाहीत असे स्पष्ट केले आहे. आता या निर्णयाचा इतरही अनेक बदल्यांवर परिणाम होऊ शकतो. या प्रकरणात पोलीस कर्मचाऱ्यांच्या वतीने विधिज्ञ ओ डी माने, अमोल चालक आदींनी बाजू मांडली. बाळकृष्ण जायभाये, संगीता शिरसाट, कृष्णा जायभाय, संतोष गाडे, रामहरी भंडाने, माधव भागवत, रेखा पवार, सौदागर सावंत, सुभाष क्षीरसागर, सुसेन पवार, परमेश्वर शिंदे, प्रकाश गायकवाड, दत्तात्रय उबाळे, उस्मान शेख, संजयकुमार राठोड, सचिन जायभाये, तानाजी डोईफोडे, मनोज घोडके.

---

सक्रिय झाले आहेत. त्याचवेळी अंधारे यांनी त्यांची इच्छा व्यक्त केल्याचे समजते. महाविकास आघाडीतील एकमेव जागेसाठी आता वरिष्ठ नेत्यांमार्फत उद्धव सेनेचे शिलेदार त्यांची उमेदवारी पक्की करण्यासाठी पुढे आले आहेत.

---

ही कामाला बाहेर निघून गेल्यानंतर त्याने हे टोकाचं पाऊल उचललं. हरिष हा भूमिहीन असून अत्यंत गरीब कुटुंबातील होता, अशी माहिती समोर आली आहे.

गेल्या 2 ते 3 वर्षांपासून बरीशचे वडीले हे त्याच्या लग्नासाठी एखादं स्थल, मुलगी शोधत होते. मात्र त्यांच्या घरच्या गरीब परिस्थितीमुळे हरीशला मुलगी द्यायला कोणीच त□र नव्हतं. खूप प्रयत्न करूनही लग्नासाठी मुलगी न मिळाल्याने,त्याच नैराशातून त्याने आत्महत्या केली, आयुष्य संपवलं. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे .तर अशीच दुसरी दुर्दैवी घटना घडली ती चिखली तालुक्यातील मंगरूळ येथे. तेथे राहणाऱ्या अवघ्या 25 वर्षांच्या सत्यपाल भिसे यावनेही आत्महत्या करत लाखमोलाचं आयुष्य संपवलं. त्यांचही लग्न बऱ्याच काळापासून ठरत नव्हतं, याच रागातून, नैराश्यातून त्याने व्यसनाधीन होऊन झाडाला फास लावून घेत आणि आपली जीवनयात्रा संपवली. सत्यपालच्या सोबत असलल्या सर्व मित्रांचं लग्न झालं होतं. पण त्याचंच लग्न ठरत नव्हतं. तसेच सत्यपालचं शिक्षण भरपूर झालं होतं, तरीही त्याला कुठेच नोकरी मिळत नवहृती, ना त्याचं लग्न ठरत होतं. त्यामुळे त्याला दारूचे व्यसन सुद्धा लागले होते. या चनैराश्यातून त्याने आत्महत्येचे पाऊल उचललं अशी माहिती समोर आली. दोन्ही प्रकरणात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आले असून पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे.

---

आले होते.या निमित्ताने संभाजीनगर येथे मराठवाडा विभागीय नेते व कार्यकर्ते यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला खा. आठवले यांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीस रिपाईचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, महाराष्ट्र कार्याध्यक्ष बाबुराव कदम, मराठवाडा अध्यक्ष मिलिंद शेळके, उपाध्यक्ष प्रा. दासू वाघमारे आदी प्रमुख नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

---

संपर्क होऊ शकला नाही. यामुळे त्यांचे कुटुंबीय प्रचंड चिंतेत होते. नातेवाईक, मित्रमंडळी आणि स्थानिक नागरिकांनी बीड शहराच्या विविध भागात तसंच संभाव्य ठिकाणी त्यांचा कसून शोध घेतला, परंतु त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही. अखेर या प्रकरणी पोलिसातही माहिती देण्यात आली होती. सोमवारी दुपारच्या सुमारास घोडका राजुरी तलावाच्या परिसरात काही ग्रामस्थांना पाण्यात एक मृतदेह तरंगताना दिसून आला. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरली आणि बघ्यांची मोठी गर्दी जमली. माहिती मिळताच मृताच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तो मृतदेह बेपत्ता असलेल्या शशिकला जाधव यांचाच असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेमुळे जाधव कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

---

उष्मकाळात पर्यावरणाचे संतुलन रहात असते .या प्रकल्पामध्ये विद्यार्थीनींनी विविध साहित्यांचा उपयोग करून लाकडी घरट्यांच्या स्वरुपातील फीडर तयार केले, तर काहींनी प्लास्टिक बाटल्या व पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंमधून आकर्षक आणि टिकाऊ फीडर तयार केले. या सर्व मॉडेल्समध्ये पक्ष्यांना सुरक्षितपणे बसता येईल आणि अन्न-पाण्याची सोय होईल, याची विशेष काळजी घेण्यात आली.

हे उपकरण तयार करण्यासाठी प्राणी शास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. विद्या गुळभिले तसेच प्रा . शरद रोडे यांचे मार्गदर्शन लाभले .या नाविन्यपूर्ण उपकरणाचे अनावरण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ . विद्या देशपांडे व महाविद्यालयाचे कोषाध्यक्ष प्रा.प्रसाद देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी प्राणीशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती .

---

मुद्देमालाची किंमत सुमारे 2,66,640 रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध तलवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पथकात नायब तहसीलदार गजानन मोरे, सपोनि संतोष जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, तसेच पोलीस हवालदार आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, अतुल हराळे, सुधीर जोशी आणि तलवडा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. अवैध गांजा विक्रीविरोधात पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, अशा बेकायदेशीर व्यवसायांवर पोलिसांचा वचक वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

---

वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी मोटारसायकलही पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. आरोपी बेकायदेशीररित्या दारू विक्री करून आर्थिक फायदा मिळवत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. या कारवाईत उपनिरीक्षक मुकुंद ढाकणे, हेड कॉन्स्टेबल शिवाजी सानप, जमीर शेख व इतर पोलीस कर्मचारी सहभागी

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
गुरुवार दि. 23 एप्रिल 2026



# "कृषीकुल" आधुनिक शेतीचे विद्यापीठ; देशभरातील शेतकऱ्यांसाठी परिवर्तनाचे केंद्र

## पालघर येथील 48 शेतकऱ्यांचे यशस्वी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) ग्लोबल विकास ट्रस्टच्या सिरसाळा येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या "कृषीकुल" शेतकरी प्रशिक्षण केंद्राने आधुनिक व शाश्वत शेतीचे एक प्रभावी आणि आदर्श मॉडेल उभे केले आहे. बीड जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता हे केंद्र आता संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. परिणामी, येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पारंपरिक शेतीतून मिळणारे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, पिक पद्धतीतील बदल आणि नव्या संधींचा शोध अत्यावश्यक ठरतो. याच दृष्टीने "कृषीकुल" शेतकऱ्यांना तंत्रशुद्ध, सखोल आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शन देत त्यांना सक्षम बनविण्याचे काम करत आहे.

नुकतेच पालघर जिल्ह्यातील 48 शेतकरी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी कृषीकुल येथे दाखल झाले. या प्रशिक्षणात रेशीम शेतीचे सर्वांगीण मार्गदर्शन देण्यात आले. जमिनीची तयारी, आळी संगोपन, रेशीम शेड उभारणी, व्यवस्थापन, रोग ओळख व प्रतिबंध तसेच कोष संकलन यांसारख्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. पान 3 वर

# परिवहन कार्यालयाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी 15 कोटी

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश; मुख्यमंत्र्यांचे मानले आभार



अंबाजोगाई: येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विकासासाठी राज्य सरकारने मोठा निधी उपलब्ध करून दिला असून कार्यालयाच्या दुसऱ्या टप्प्यातील इमारत बांधकामाच्या 14 कोटी 99 लाख 75 हजार 406 रुपयांच्या निधीस प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता प्रदान केली आहे. यामुळे या कार्यालयाच्या विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

विशेष म्हणजे या इमारतीच्या पहिल्या टप्प्याचे बांधकाम आधीच पूर्ण झाले असून त्या ठिकाणी सध्या नियमित कार्यालयीन कामकाज सुरू झाले आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या कामासाठी सातत्याने केलेल्या भक्कम पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाला आहे. पान 3 वर

# मस्साजोग सरपंच पोटनिवडणुकीत ट्विस्ट

- अश्विनी देशमुख यांना निवडणूक लढवायची नव्हती : स्वरूपानंद देशमुख; माझ्यावर कोणाचाही दबाव नाही : अश्विनी देशमुख




बीड : स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी होत असलेल्या पोटनिवडणुकीत आता राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. या निवडणुकीत समोरासमोर उभे असलेले उमेदवार अश्विनी देशमुख आणि स्वरूपानंद देशमुख यांच्यातील संघर्षाला आता नवे वळण मिळाले आहे.

विरोधी उमेदवार स्वरूपानंद देशमुख यांनी मोठा दावा करत सांगितले की, स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना ही निवडणूक मुळात लढवायचीच नव्हती. मात्र कुटुंबीयांच्या दबावामुळे त्यांना रिंगणात उतरावे लागले. या विधानामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवे राजकीय वादळ उठले आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर गावात आधीच तणावाचे वातावरण असताना आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोपांमुळे राजकीय पान 3 वर

# बीडचे पोलिस अधीक्षक यांना मॅटचा दणका

## अठरा पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या रद्द




बीड : मागील वर्षी बीडच्या पोलिस अधीक्षकांनी मोठ्या स्वरुपात केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या वादग्रस्त ठरल्या होत्या. अनेक कर्मचाऱ्यांनी या बदल्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) आव्हान दिले होते. त्यातील 18 बदल्या मॅटने रद्द केल्या आहेत. पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेला ही सण-सणीत चपराक मानली जात आहे.

बीडच्या पोलिस अधीक्षकांनी मागच्या वर्षी शेकडो कर्मचाऱ्यांच्या घाऊक बदल्या केल्या होत्या. एकाचवेळी इतक्या मोठ्या प्रमाणावर बदल्यांची ही पहिलीच वेळ होती. स्वग्राम, खंडीत, अखंडित आदींच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या करण्यात आलेल्या बदल्यांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी होती. अनेकांनी या बदल्यांना मॅट मध्ये आव्हान दिले होते. त्याची सुनावणी देखील दीर्घकाळ चालली. यात आता अखेर मॅट ने निर्णय दिला असून तब्बल 18 बदल्या रद्द करण्यात पान 3 वर

# विधान परिषदेसाठी मातोश्रीवर जोरदार लॉबिंग; उद्धव ठाकरे यांच्या ऐवजी कोणता चेहरा सर्वात समोर?

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एकच जागी आली आहे. त्या जागेसाठी उद्धव सेनेच्या गोटातून जोरदार रस्सीखेच सुरू आहे. काही नेत्यांनी थेट मातोश्रीवर लॉबिंग सुरू केली आहे. उद्धव सेनेतून या तीन चेहऱ्यांची जोरदार चर्चा सुरु आहे. त्यातील एका नेत्याने रश्मी ठाकरे यांना विधान परिषदेसाठी गळ घातल्याचे समजते. उद्धव ठाकरे जर विधान परिषदेवर जाणार नसतील, तर महाविकास आघाडीतील सत्ता समीकरणं बदलतील का? अशी चर्चा सुरु असतानाच आमदारकी पदरात पाडून घेण्यासाठी काही नेत्यांनी मातोश्रीवर वजन वापरण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे दिसत आहे.विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांचे नाव आघाडीवर मानले जाते. त्यांनी मातोश्रीवर लॉबिंग सुरु केल्याचा दावा करण्यात येत आहे. सुषमा अंधारे यांनी आमदारकीसाठी रश्मी ठाकरे यांना गळ घातल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. इतरही इच्छुक पान 3 वर

# एसटीसाठी रितेश-जेनेलिया पुढे सरसावले, दोघे एसटीचे ब्रँड ॲम्बेसेडर



मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) आणि परिवहन खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'रस्ता सुरक्षा अभियाना'च्या जनजागृती उपक्रमाला बळकटी देण्यासाठी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे सुपुत्र प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख आणि सून अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची पुढील पाच वर्षांसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीचा करार हस्तांतरण सोहळा आज, बुधवार 22 एप्रिल रोजी मंत्रालयात पार पडला. हा सोहळा मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

एसटी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती मोहिमांना अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविणे, तसेच परिवहन खात्याच्या ' रस्ता सुरक्षा अभियाना 'ची जनजागृती अधिक परिणामकारक करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली आहे.विशेषतः रस्ता सुरक्षा, प्रवासी जनजागृती आणि सामाजिक संदेशांच्या प्रसारासाठी या दोन्ही कलाकारांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगण्यात आले आहे. रितेश देशमुख यांची नवीन चित्रपट राजा शिवाजी प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी त्याचे धमाल, हाऊसफुल चित्रपट चांगलाच बिझनेस केला होता.

पान 3 वर

# मुली नकार द्यायच्या, लग्नच जुळेना, प्रचंड नैराश्यातून दोन तरूणांनी त्या घटनेने महाराष्ट्र हादरला






लग्न करुन संसार मांडावा, चांगलं आयुष्य जगावं असं प्रत्येक तरुण-तरुणीचं स्वप्न असतो. सुखी संसाराची सगळ्यांनाच आस असते. पण याच लग्नाच्या स्वप्नामुळे बुलढाण्यात दोन तरण्याताठा व्यक्तींनी नको ते पाऊल उचलत आपलं आयुष्यच संपवून टाकलं. लग्न जुळत नसल्याने बुलढाणा जिल्ह्यात पाच दिवसांत दोन तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून यामुळे प्रचंड कलबळ माजली आहे. दोन तरुणांच्या जाण्यामुळे नागरिक हळहळत असून त्यांच्या कुटुंबियांवर तर दुःखाचा अक्षरशः डोंगरच कोसळला आहे. संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा येथे हरीश वानखेडे यांनी आयुष्य संपवलं तर चिखली तालुक्यात मंगरूळ येथे सत्यपाल भिसे यांनीही आत्महत्या केल्या. या हृद्यद्रावक घटनेमुळे सर्वच हळहळत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पहिली घटना ही बुलढाणा जिल्ह्याच्या संग्रामपूर तालुक्यात येणाऱ्या सोनाळा येथे घडली होती. लग्न होत नसल्याच्या नैराश्यातून 28 वर्षाच्या तरुणाने आपल्याच राहत्या घरात गळफास घेऊन जीवन यात्रा संपवल्याची हृदयद्रावक घटना घडली. हरिष वानखडे, असं तरुणाचे नाव आहे. त्याच्या घरातली सगळी माणसं पान 3 वर



- शिरूर कासार येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे महाराष्ट्र शासनाच्या पटपडताळणी कार्यक्रमानिमित्त भेट दिलेल्या मा.राजेश खटावकर (अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, बीड) यांचा मुप्टा शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. शशिकांत जावळे, प्रा. नारायण घोलप व प्रा. महारुद्र डोंगरे उपस्थित होते.

## रिपाईची संभाजीनगर येथे मराठवाडा विभागीय बैठक संपन्न

# भास्कर रोडे यांनी केला केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार



परळी प्रतिनिधी. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय समाजकल्याण मंत्री खा. रामदासजी आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत संभाजीनगर येथे मराठवाडा विभागीय बैठक नुकतीच संपन्न झाली. यावेळी रिपाईचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे यांनी खा. रामदास आठवले यांचा सत्कार केला.

केंद्रीय समाजकल्याण मंत्री झाल्यानंतर खा. रामदास आठवलेंच्या पहिल्यांदाच मराठवाडा दौऱ्यावर पान 3 वर

# बीडमधील महिला घरातून बेपत्ता; दोन दिवसांनी तलावात बॉडी आढळली



बीड: शहरातील धोंडीपुरा भागातील थिंगळे गल्ली येथे राहणाऱ्या एका 55 वर्षीय महिलेचा दोन दिवसांनंतर दुर्दैवी अंत झाल्याची घटना समोर आली आहे. शशिकला अशोक जाधव असे या मृत महिलेचे नाव असून, त्यांचा मृतदेह सोमवारी दुपारी घोडका राजुरी तलावात तरंगताना आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण बीड शहरात आणि परिसरात मोठी खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शशिकला जाधव या गेल्या दोन दिवसांपासून आपल्या घरातून अचानक बेपत्ता झाल्या होत्या. त्या थिंगळे गल्ली येथे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होत्या. घरातून बाहेर पडल्यानंतर बराच वेळ झाला तरी त्या घरी परतल्या नाहीत, तसंच त्यांचा कोणाशीही पान 3 वर

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाचा पर्यावरण पूरक उपक्रम



परळी वैजनाथ दि.22 (प्रतिनिधी) येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे नेहमी अनेक पर्यावरण पोषक उपक्रम राबवीत असते. त्याचाच एक भाग म्हणून या महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या विद्यार्थीनींनी विभागांतील तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनात बर्डफीडर स्टँड या नावीन्यपूर्ण उपकरणाची निर्मिती केली .

भूतदया गायी पशूंचे पाळण ।
तान्हेल्या जीवन जगामाजी ॥

या संत तुकाराम महाराजांच्या वचना प्रमाणे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हे एक अभिनव असे महत्त्वाचे कार्य आहे. पक्ष्यांना अन्न व पाणी सहज उपलब्ध व्हावे, याने या पान 3 वर

# गेवराईत गांजा विक्री करणाऱ्यावर पोलिसांची कारवाई

## 8 किलो 888 ग्रॅम गांजासह 2.66 लाखांचा मुद्देमाल जप्त, एकास अटक



गेवराई : गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे गांजा बाळगून त्याची चोरटी विक्री करणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखा व तलवडा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत तब्बल 2 लाख 66 हजार 640 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिरसदेवी येथे गांजाची विक्री सुरु असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून त्यांनी तत्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा व तलवडा पोलीस ठाण्याच्या पथकाने सिरसदेवी येथे धाड टाकली.

या वेळी शेख रईस शेख युसूफ (वय 25, रा. सिरसदेवी) याच्या घराची झडती घेतली असता 8 किलो 888 ग्रॅम गांजा आढळून आला. जप्त केलेल्या पान 3 वर

# धारूर पोलिसांची कारवाई; अवैध देशी दारूसह मोटारसायकल जप्त




धारूर : अवैध देशी दारू विक्री व वाहतुकीवर धारूर पोलिसांनी मोठी कारवाई करत परिसरातील बेकायदेशीर धंद्यांवर जोरदार आघात केला आहे. या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली 20 एप्रिल रोजी सायंकाळी कासारी फाटा परिसरात सापळा रचून छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपीच्या ताब्यातून देशी दारुचा मोठा साठा जप्त करण्यात आला.

या कारवाईत सुमारे 1 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अवैध दारू पान 3 वर